**SET-4**

**Series AQ@QA/C**

प्रश्न-पत्र कोड
Q.P. Code **8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ **6** हैं ।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए प्रश्न-पत्र कोड को परीक्षार्थी उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें ।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में **5** प्रश्न हैं ।
- **कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, उत्तर-पुस्तिका में प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें ।**
- इस प्रश्न-पत्र को पढ़ने के लिए 15 मिनट का समय दिया गया है । प्रश्न-पत्र का वितरण पूर्वाह्न में 10.15 बजे किया जाएगा । 10.15 बजे से 10.30 बजे तक छात्र केवल प्रश्न-पत्र को पढ़ेंगे और इस अवधि के दौरान वे उत्तर-पुस्तिका पर कोई उत्तर नहीं लिखेंगे ।
- Please check that this question paper contains **6** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **5** questions.
- **Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 2 तास* | *गुण : 40*
*निर्धारित समय : 2 घण्टे* | *अधिकतम अंक : 40*
*Time allowed : 2 hours* | *Maximum Marks : 40*

*सर्वसाधारण सूचना :*

*खालील सूचना लक्षपूर्वक वाचून प्रश्न-पत्रिका सोडवावी.*

*(i)* *या प्रश्न-पत्रिकेत अ, ब, क असे तीन विभाग आहेत. व्याकरण, लेखन, गद्य-पद्य पाठ.*

*(ii)* *विभाग अ (व्याकरण) प्रश्नासोबत दिलेल्या सूचनेच्या आधारे दोन्ही प्रश्न सोडवावित.*

*(iii)* *विभाग ब (लेखन) प्रश्नासोबत दिलेल्या सूचनेच्या आधारे दोन्ही प्रश्न सोडवावित.*

*(iv)* *विभाग क (गद्य-पद्य पाठ) दिलेल्या सूचनेच्या आधारे सोडवावीत.*

***General Instructions :***

*Read the following instructions carefully and follow.*

*(i)* *This question paper contains 3 sections – Grammar, Writing skills and Textbooks.*

*(ii)* *Part A (Grammar) contains 2 questions, attempt both questions based on specific instructions given in the question itself.*

*(iii)* *Part B (Writing skill) consists 2 questions. Attempt both questions based on specific instructions given in the question itself.*

*(iv)* *Part C contains (Textbooks based questions). Attempt as per the instructions given in the question itself.*

**1.** खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

करडला त्यावेळी केसरी, ज्ञानप्रकाश व नवाकाळ एवढीच वर्तमानपत्रे वाचावयास मिळत असत. अन्नसत्याग्रहाचे काय झाले हे समजण्यासाठी मी रानातल्या वस्तीवरुन रोज दोन तीन मैल गावात येत असे. कंबरेइतक्या पाण्यातून नदी ओलांडून मी येत असे. त्यावेळी वर्तमानपत्र वाचावयास मिळणे हे सहजसुलभ नव्हते. ज्या कोणाकडे वृत्तपत्र येत असेल, त्याच्याकडे जाऊन ते वाचावे लागे. मी रोज तसे करीत असे. क्रांतिकारकांच्या उपोषणाने मी अस्वस्थ झाली होती. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची उपासमारीने शक्ती संपत आली होती, परंतु त्याहीपेक्षा एक महिन्याने उपवास सुरु केलेले जतींद्रनाथ यांस उपवासाने प्रेतकळा आल्याची वर्णने येत होती. एकतर सरकारने शुद्धीवर आले पाहिजे किंवा प्राणाने देह सोडून गेले

पाहिजे अशा अटीतटीने क्रांतिकारकांचा उपवास सुरु झाला होता. वर्तमान पत्रात त्यावेळी येणारी वर्णने चित्तथरारक होती. का कोणास ठाऊक, परंतु जतींद्रनाथाच्या उपोषणाने मला घायाळ केले होते. शेवटचे वीस दिवस तर जतींद्रनाथांची प्रकृती क्षणाक्षणाला घसरत असल्याचे वृत्त येऊ लागले. धडधडत्या अंत:करणाने मी ते वाचीत होतो. जतींद्रनाथांच्या सुटकेच्या बाबतीत सरकारने धरलेला निष्ठुरपणा यमालाही लाजविणारा होता असे मला वाटे.

जतींद्रनाथ हे काही थोड्या घटकांचे सोबती असताना व पंजाब सरकार त्यांना सोडून भावाच्या ताब्यात देण्यास तयार असतानाही त्यांच्याकडून जामीन घेतल्यावाचून त्यास सोडू नये अशी सरकारने अपमानास्पद अट घातली. परंतु या अटीपुठे मान तुकविण्यास जतींद्रनाथाचा भाऊ कबूल नव्हता. दुसरे काहीजण जामीन भरण्याच्या तयारीने पुढे आलेही, परंतु स्वत: जतींद्रनाथांची जामिनावर सुटका करुन घेण्याची तयारी नव्हती. जणू काही इहलोकाच्या बंदिवासातून कायमची सुटका करुन घेण्याच्या क्षणाचीच ते वाट पाहात होते. माझ्या बालमनावर या घटनांचा चिरकाल परिणाम झाला. देशासाठी देह सोडणारे जतींद्र माझे कोणी जवळचे आप्त आहेत असे माझ्या मनाने ठामपणे घेतले. बासष्ट दिवस जतींद्रनाथांनी देशासाठी तीळ तीळ आहूती दिली आणि बासष्टाण्या दिवशी लाहोरच्या तुरुंगात भर दुपारी एक वाजता सूर्याला साक्ष ठेवून त्यांनी स्वदेहाची पूर्णाहूती दिली.

मातृदेवतेसाठी झिजूनझिजून त्यांनी प्राणार्पण केले. जतींद्रांचा आत्मयज्ञ ही एकच एक घटना त्या दिवशी सर्वांमुखी होती. वृत्तपत्रात त्या आत्मयज्ञाचे वृत्त वाचले. आणि या प्रसंगाने मी भांबावून गेलो. जतींद्रानी देशासाठी प्राण दिला या घटनेने मला बेचैन केले. काय होत आहे हे समजेनासे झाले.

(अ) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. *4*

(i) वर्तमानपत्र मिळविण्यासाठी लेखकाला किती कष्ट घ्यावे लागत असत ?

(ii) क्रांतिकारकांच्या उपोषणाबद्दल कोणती माहिती मिळत होती ?

(iii) जतींद्रनाथांच्या उपोषणामुळे लेखकाच्या मनाची अवस्था कशी झाली होती ?

(ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाबद्दल तुमचे विचार व्यक्त करा. *3*

(i) जतींद्रनाथांबाबत सरकारचे धोरण कोणते होते ?

(ii) जतींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वातील कोणते गुण तुम्हांला या परिच्छेदामध्ये व्यक्त होताना दिसतात ?

**2.** (अ) खालील प्रश्नांची सुमारे 30 से 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही 2) *4*

(i) डॉ. माशेलकरांनी मुंबईतील बालपणीच्या कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत ?

(ii) पाठाआधारे आत्मचरित्र या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

(iii) भडसावळे गुरुजीनी निरंजनला अभ्यासासाठी योग्य वेळ कोणती सांगितली होती व कां ?

(iv) पाठाआधारे कविवर्य कुसुमाग्रजांची तुम्हाला समजलेली माहिती सांगा.

(ब) खालील प्रश्नांची सुमारे 50 ते 60 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही 2) *6*

(i) डॉ. माशेलकरांनी शाळेतील भावे सरांबद्दलची कृतज्ञता कोणत्या शब्दांत व्यक्त केली आहे ?

(ii) कथेचे विविध प्रकार सांगून कथा या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लिहा.

(iii) निरंजनमध्ये खऱ्या नागरिकाची कोणकोणती वैशिष्ट्ये तुम्हाला दिसून येतात ते स्पष्ट करा.

**3.** (अ) खालील प्रश्नांची सुमारे 30 से 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही 2) *4*

(i) 'स्वप्न करु साकार' या कवितेत व्यक्त झालेली एकतेची भावना व श्रमप्रतिष्ठा तुमच्या शब्दांत लिहा.

(ii) रणांगणावर प्रत्यक्ष लढणाऱ्या सैनिकांचा इंदिरा संतांनी वर्णन केलेला पराक्रम तुमच्या शब्दांत लिहा.

(iii) 'औक्षण' कवितेच्या संदर्भात 'दीनदुबळे' या शब्दाचा तुम्हाला जाणवलेला अर्थ लिहा.

(ब) खालील पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतेही 1) *3*

(i) या हातांनी यंत्र डोलते
श्रमशक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते
आभाळावर उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।

(ii) अशा असंख्य ज्योतींची

तुझ्या मागून राखण;

दीनदुबळ्यांचे असें

तुला एकच औक्षण.

(क) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे 50 – 60 शब्दांत उत्तर लिहा. *3*

(i) व्युत्पत्तिकोशा मध्ये 'इनामदार' या शब्दाची कोणती माहिती सांगितली होती, ते स्पष्ट करून सांगा.

(ii) व्युत्पत्तिकोशा मध्ये शब्दाची माहिती कशा पध्दतीने दिलेली असते ?

**4.** (अ) कंसातील सूचनांनुसार उत्तरे द्या. (कोणतेही 1) *2*

(i) टेकडीच्या <u>मागून</u> नदी वहाते. [अधोरेखित शब्दाची जात ओळखा.]

(ii) ती मुलगी शाळेत गेली. [वाक्याचे रुपांतर अनेकवचनी वाक्यात करा.]

(iii) सर्व <u>लेखक</u> आणि <u>संपादक</u> यांची एकत्र सभा झाली.
[वाक्यातील अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.]

(ब) कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा. (कोणतेही 1) *2*

(i) संगीता खूप काम करते.
[वाक्याचा काळ ओळखा आणि या वाक्याचे भविष्यकालीन रूपांतर करा.]

(ii) संजय तुम्हाला मदत करेल.
[वाक्याचा काळ ओळखा आणि या वाक्याचे भूतकालीन रूपांतर करा.]

(iii) गायकाच्या गाण्याने मैफिलीत रंग भरला.
[वाक्याचा काळ ओळखा आणि या वाक्याचे वर्तमानकालीन रूपांतर करा.]

(क) कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा. (कोणतेही 1) *2*

(i) जाहिराती तयार करताना <u>समर्पक</u> भाषा असावी.
[अधोरेखित शब्दाचा समानार्थी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.]

(ii) किती सुंदर आहे ही इमारत !
[वाक्याचा प्रकार ओळखून विधानार्थी वाक्य करा.]

(iii) सर्वांनी झाडाखाली बसून भोजन करावे.
[वाक्याचा प्रकार ओळखून आज्ञार्थी वाक्यात रूपांतर करा.]

(iv) मला कोणीतरी बोलावते आहे.
[वाक्याचा प्रकार ओळखून प्रश्नार्थक वाक्यात रूपांतर करा.]

(ड) खालील सामासिक शब्दांचा योग्य विग्रह करून समास ओळखा. [कोणतेही 1] *2*

(i) सप्ताह

(ii) क्षणोक्षणी

(iii) आईवडील

**5.** खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक) *5*

आपण रहात असलेल्या भागात पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा होत नाही, याविषयी तक्रार करणारे पत्र संबंधित अधिकाऱ्यास (शोभना/समीर देशमुख देवी गल्ली, कसबापेठ पुणे येथून लिहित आहे.)

**किंवा (OR)**

शीतल साळुंखे, आदर्श शिक्षण मंदिर, संगमनेर येथून शालेय साहित्याची मागणी करणारे पत्र मंगल जनरल स्टोअर्स, गंगापूर रोड, नासिक या दुकानदारास लिहित आहे.